यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

१२/११/२०२५

**संमंत्रकांसाठी दोन दिवसीय मार्गदर्शनपर ऑनलाइन कार्यशाळेचा अहवाल**

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी (P04) आणि पदव्युत्तर पदवी (P16) शिक्षणक्रम कार्यान्वित असून सदर शिक्षणक्रमांच्या नव्याने देण्यात आलेल्या अभ्यासकेंद्रांच्या संमंत्रकांसाठी दि. ७ व ८ नोव्हेंबर २०२५ रोजी मार्गदर्शनपर दोन दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली होती. सदर शिक्षणक्रमाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रात्यक्षिक व प्रकल्प याविषयी तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्प शिबिराबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी ग्रंथालयशास्त्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांवरील संमंत्रक या कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी पहिल्या सत्रात डॉ. नारायण बारसे (ग्रंथपाल व विभागप्रमुख, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, के.जी.जोशी कला महाविद्यालय, आणि एन जी बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे) यांनी B.Lib I.Sc शिक्षणक्रमातील प्रकल्प आणि M.Lib I.Sc शिक्षणक्रमातील LIB302 या अभ्यासक्रमातील प्रकल्प व शोधनिबंध याविषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन साहित्य वाचण्यासाठी व समंत्रणसत्रांना उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करावे असे त्यांनी आवाहन केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. संभाजी पाटील (ग्रंथपाल,मेट इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग,नाशिक) यांनी ग्रंथ तालिकीकरण तात्विक आणि प्रात्यक्षिक अभ्यासक्रमाचे, उदाहरणांसहीत सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पहिल्या सत्रात डॉ स्वाती भडकमकर (ग्रंथपाल, बी.वाय.के कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक) यांनी ग्रंथ वर्गीकरण तात्विक व प्रात्यक्षिक या अभ्यासक्रमाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी तसेच सदर अभ्यासक्रम दिलेल्या संपर्कसत्रांमध्ये कसा पूर्ण करावा याबद्दल उपयुक्त असे मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. मधुकर शेवाळे (माजी ग्रंथपाल,यचममुवि,नाशिक आणि संचालक, CIQA, YCMOU) यांनी मुक्त विद्यापीठाबद्दल माहिती दिली व विद्यापीठाची ध्येय धोरणे यावर चर्चा केली. संमंत्रकांची मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाच्या संदर्भात आदर्श भूमिका यावरही मार्गदर्शन केले.

प्रत्येक सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरांसाठी संमंत्रकांनी चांगला प्रतिसाद दिला व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी त्यांचे समाधान केले.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी प्रास्ताविक केले व कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शैक्षणिक संयोजक रुपाली गायकवाड यांनी केले. कार्यशाळेसाठी तांत्रिक सहाय्य शैक्षणिक संयोजक डॉ. विशाल आंबेडकर व शिक्षकेतर कर्मचारी श्री. गुलाब घाटाळ यांनी केले.

Wadekar
12/11/2025

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

# संमंत्रकांसाठी दोन दिवसीय मार्गदर्शनपर ऑनलाइन कार्यशाळा



















